बनवा स्वतःच, मजेदार खेळणी

रॉबर्ट लोपशायर

मराठी: अश्विनी बर्वे

बनवा स्वतःच,
मजेदार खेळणी

एक साधन असे तयार करा

१ एक मोठे खोके घ्या.
मजबूत दोरी घ्या.



२. खोक्याला खाली
एक छिद्र पाडा.



३. दोरीच्या एका टोकाला
एक काडी बांधा आणि दोरी
खोक्याच्या छिद्रातून बाहेर
काढा.

४. दोरीच्या दुसऱ्या
टोकाला झाडू बांधा.

५. झाडू अशाप्रकारे पकडा
आणि संगीत तयार करा...

..... आणि मस्त वाद्य वाजवा.

छोटे आकाश कंदिल तयार करा

१. कागदाचा एक तुकडा
आणि कात्री घ्या.

२. कागद मधोमध
असा दुमडा.



३. आता चित्रात दाखवले
आहे तसा कागद कापा..

४. मग हळूच दुमडलेला
कागद उघडा आणि
त्याच्या बाजू चिकटवा...

५. कागदाची एक वेगळ्या
रंगाची पट्टी करून हातात
धरता येईल अशी कडी तयार
करा आणि चिकटवा.

खूप सारे असे आकाश कंदिल तयार
करा आणि छान टांगा..!

बटणाचा उत्कृष्ट खेळ तयार करा

१ एक बटण घ्या. त्यासाठी मोठे बटण चांगले राहील.

२.दोरीचा एक तुकडा घ्या..



३. दोरी बटणाच्या दोन छिद्रातून घाला.

४. दोरीला गाठ बांधा.

५. दोरीचे दोन्ही टोक बोटात घाला.

६. मग दोरी ताठ करा आणि सैल सोडा.बघा काय होते ते..

असे फिरवत रहा.

कदाचित तुम्ही सतत तेच करत राहाल.!

गोड सुगंधी चेहरा तयार करा

१. आईला विचारून
एक संत्र, एक टूथपिक
आणि थोडे लवंग घ्या.

२. संत्र्याला टूथपिकने
बारीक छिद्रे पाडा,त्याचे
डोळे आणि नाक आणि
तोंड काढा..

३. त्या छिद्रयांमध्ये
लवंग लावा..

४. आता केसांसाठी भरपूर
छिद्रे करा.

५. त्यात भरपूर
लवंग लावा.

तुमच्या खोलीमध्ये हा गोड चेहरा ठेवा
आणि सगळीकडे सुंगध पसरेल.

कागदाची भिंगरी तयार करा

१. कागदाचा एक तुकडा,एक मोती आणि एक पिन घ्या..



२. चित्रात दाखवल्याप्रमाणे कागद चार ठिकाणी कापा..



३. कागदाच्या चारी बाजू दाखवल्याप्रमाणे दुमडून घ्या..

४. अशा पद्धतीने पिन कागदात घाला.

५. पिनेला मोती अशा पद्धतीने लावा.

६. मगपिनेच्या टोकत काडी लावा.

७. मगभिंगरी घेऊन पळा, ती गरगर गोल फिरेल.

कागदाची चटई तयार करा

१. तुम्ही एक कात्री आणि रंगीत कागदाचे दोन तुकडे घ्या.



२. एक तुकडा चित्रात दाखवल्याप्रमाणे कापा.

३. दुसऱ्या तुकड्याच्या पट्ट्या कापा.

४. हळूहळू एक एक पट्टी कापलेल्या कागदात चित्रात दाखवल्याप्रमाणे घाला.



५. सर्व पट्ट्या अशाच विणून घ्या..



अशी तयार झालेली चटई आपल्या मित्राला भेट द्या..

घरात जंगल कसे वाढवायचे

१. आईकडून एक
रताळे मागून घ्या..

२. चार टूथपिक आणि
एक ग्लास पाणी घ्या.

३. रताळयामध्ये
टूथपिक घाला.

४. रताळे पाण्याच्या
ग्लास मध्ये ठेवा.

५. ते ओले राहिल असे
बघा आणि जंगल कसे
वाढते ते बघा.

पण लक्ष द्या बरं तिकडून
वाघोबा येईल बरं!

उडणारा पक्षी तयार करा

१. एक रबरी बुच घ्या आणि लहान जाड कागद घ्या.

२. कागद असा कापा.

३. मग त्या दोन बाजू अशा दुमडा.



४. टूथपिक कागदाला अशी चिकटवा..

५. मग त्या टूथपिकचे टोक रबरी बुचात खोचा.

६. मग पक्ष्याला बाहेरच्या हवेत न्या आणि उडवा.

पिपाणी तयार करा

१. एक कागद घ्या.

२. त्यामध्ये एक पट्टी कापा.

३. कागदाच्या मध्ये छोटे छिद्र कापा.



४. मग परत अशी घडी करा.



५. तुमच्या तोंडाजवळ अशी धरा.

६. आता जोरात त्यात हवा फुंका!

तुम्ही तुमच्या मित्रांना असा आवाज देऊ शकतात.

बोलका कुत्रा तयार करा

१. एक लहान कागदी पिशवी घ्या.

२. काही रंगीत खडू घ्या.

३. त्याच्या साहय्याने कुत्र्याचा चेहरा काढा.

४. त्याचे तोंड काढा.

५. दुसऱ्या रंगीत कागदापासून त्याचे कान कापा.

६. रंगीबेरंगी कान चिकटवा.

७. पिशवीत स्वतःचे हात घालून बोटं हलवा आणि कुत्र्याशी बोला.

.

तो तुमच्याशी अनेक तास बोलेल!

बटाटयाचे छाप तयार करा

१. तुमच्या आईकडून
एक बटाटा, एक कागद,
एक ताटली आणि एक
रंग घ्या.

२. आईकडून बटाटा
अर्धा कापून घ्या.



३. अर्ध्या बटाट्यावर
एक डिझाईन कोरून
काढा.

४. ताटलीत रंग
काढा आणि बटाटा
त्यात बुडवा.

५. आता तो बटाटा
कागदावर ठेवून
छाप पाडा.

तुम्ही काय केले हे बघण्यासाठी
कागद उलटा करून बघा.....

वडिलांसाठी भेटवस्तू तयार करा

१. बटाट्याचे छाप काढलेला एक कागद घ्या आणि एक छोटा डबा घ्या.

२. तो कागद डब्याच्या मापात कापा.

३. कागद त्या डब्याला चिकटवा.

४. डब्याच्या झाकणाला पण तो छापाचा कागद लावा.

५. तो असा कापा.

६. अशा पद्धतीने तो चिकटवा.

तुमचे वडील त्यांच्या लहानसहान गोष्टी या डब्यात ठेवू शकतील.

लहान फोन तयार करा

१. दोन कागदी कप घ्या.

आणि मोठी दोरी घ्या.

३. प्रत्येक कपाला मधोमध
एक छिद्र पाडा.

४. छिद्रामधून दोरी
ओढून घ्या.



५. दोरीच्या दोन्ही
टोकाला एखादी काडी
चिटकवा.

६. दोघांच्या हातात दोन कप
पकडा आणि बोला
फोनप्रमाणे.



पाहिजे तर तुम्ही तुमच्या कुत्र्याबरोबर
सुद्धा गप्पा मारू शकतात.

कोलाज चित्र तयार करा

१. पुठ्ठा, कात्री आणि खूप रंगीत कागद घ्या.

२. कागदाचे वेगवेगळया आकारात तुकडे कापा.

३. हे रंगीत तुकडे पुठ्ठाला तुमच्या मनाप्रमाणे हवेतसे चिकटवा.

४. असे विविधप्रकारे चिकटवा.

जेव्हा कोलाज पूर्ण होईल तेव्हा ते तुमची आई भिंतीला लावेल. आता एक आईसाठी तयार करा..

रांगणारी अळी

१. एक कागद आणि कात्री घ्या.

२. कागदाचा एक लांब तुकडा घ्या
आणि त्यावर अळीचा चेहरा काढा.

३. त्याला
टेबलाला असा
वाकवा.

४. अळीचे तोंड
थोडेसे ओले
करा, फार
नाही बरं.

५. ती अळी टेबलवर ठेवून
तिला फुंकर मारा.

ती वेगाने पुढे जाईल.

कपड्यापासून किटक तयार करा

१. एक छोटे कापड, एक कपड्याला लावायचा चिमटा आणि रंगीत कागद, दोन दाब पिना.

२. चिमट्यामध्ये दाब पिना ठेवा.



३. कागदाच्या पट्ट्या कापा आणि त्या चिमट्याला चिकटवा.



४. मग पंख आणि शेपटी कापा आणि त्यावर ठिपके काढा.

५. पंख आणि शेपटी डिंकाने चिकटवा.

६. मग कपड्याचा चिमटा दाबून कीटकाचे तोंड उघडा.

धाग्यांची टोपी

१. एक कागदी कप घ्या
आणि दोरा घ्या.
स्ट्रॉ घ्या.

२. स्ट्रॉच्या गठ्ठ्याला
दोरा गुंडाळा.

३. स्ट्रॉला मधोमध
गाठ मारा.



४.कपाला छिद्र
पाडा.

५. छिद्रामधून दोरा
बाहेर काढा.

६. मग स्वतःच्या
हनुवटी खाली तो दोरा
बांधा.

सगळेजण तुमच्या टोपीची प्रशंसा करतील!

चालणारी गोष्ट तयार करा

१. एक रबर बँड, एक लाकडाचा दोन्ही बाजूला भोक असलेला ठोकळा आणि दोन टूथपिक घ्या.

२. ठोकळयाच्या दोन्ही बाजूला साबण घासा.

३. ठोकळयाच्या दोन्ही छिद्रातून रबर घाला.



४. रबरबँडमध्ये टूथपिक्स अडकवा.



५. मग तुमच्या चालणाऱ्या गोष्टीला थोडे ढकला....

६. ... मग बघा ती कशी फेरफटका मारायला जाते ते!

उड्या मारणारा विदूषक तयार करा

१. जाड कागद, कात्री आणि रंगीत खडू घे.



२. कागदावर विदूषक काढून तो नीट कापून घे.

३. आता त्याला रंग दे!



४. त्याच्या खालच्या बाजूने पाय लावण्यासाठी दोन भोके पाडा.

५. तो धावू शकतो आणि नृत्य पण करू शकतो!

मग त्यांच्यातला एक तयार करा.

पाण्यातून डिंग डॉग संगीत निर्माण करा

१. आईकडून चार जुने ग्लास आणि एक लाकडी चमचा मागून घ्या.

२. एका ग्लासमध्ये फक्त इतकेच पाणी घाला.

३. दुसऱ्या ग्लासमध्ये थोडे जास्त पाणी घाला.

.

४. तिसऱ्या ग्लासमध्ये त्याच्याहून थोडे अधिक पाणी घाला.

५. शेवटचा ग्लासमध्ये वर पर्यंत पाणी भरा.

६. तुमच्यासमोर ग्लास असे मांडून ठेवा.

७. हलकेच त्याच्यावर थाप मारा.

त्यावर रेडिओ किंवा टीव्हीवरच्या गाण्याशी जुळवून हे जलवाद्य वाजवा.

साखळी तयार करा



१. काही कागद, एक कात्री, आणि थोडे डिंक.

२. कागदाच्या पट्ट्या कापा.

३. पट्टीचे दोन्ही टोक एकमेकांना चिकटवा.

४. मग त्या गोलात अजून एक कागदी पट्टी घालून त्याची साखळी करा.

५.तिचेही दोन्ही टोके चिकटून घ्या.

६. अशा प्रकारे लांबच्या लांब - साखळी बनवा.

कदाचित तुम्ही अर्धा मैल लांब साखळी तयार केली असेल.

बटाटयाचा ससा तयार करा

१. तुम्ही एक बटाटा, डिंक, कागद, कात्री, टूथपिक, कागदी कप आणि तीन पिना घ्या.

२. दोन मोठे पाय कापा. दोन मोठे कान कापा. ते टूथपिकला चिकटवा.

३. टूथपिक बटाट्यात खोचा.

४. ही टूथपिक ग्लासमध्ये खोचा आणि ग्लासच्या खाली दोन पाय चिकटवा.

५. मिशीसाठी बटाटयामध्येदोन टूथपिक्स घाला.

६. डोळे आणि नाकासाठी दाब पिना लावा.

त नंतर बटाटा सशाची एक बहीण बनवा!

बाग तयार करा

१. एक खोल ताटली घ्या आणि काही सुंदर लहान दगड घ्या.

२. आता दोन गाजर घ्या.त खा... फक्त वरचा भाग खा आणि खालचा भाग तसाच ठेवा.

३. ताटलीत दगड ठेवून त्यात पाणी घाला.

४. मग गाजराचा खालचा भाग त्यात ठेवा.

५. दगड ओले ठेवायचे.

तुम्ही बाग केल्याने बघितलं ना काय घडलं.

भिंगरी तयार करा

१. एक कागद, एक काचेचा ग्लास आणि एक पेन्सिल कात्री, रंगीत खडू आणि एक टूथपिक सुद्धा.

२. कागदावर काचेचा ग्लास ठेवा.पेन्सिलीने वर्तुळ बनवा.

३. आता ते वर्तुळ कापून घ्या. त्यावर अशा गोल वर्तुळ काढा.

४. कागदाच्या केंद्रस्थानी टूथपिक टोचून बाहेर काढा.

५. मग ते असे टेबलवर फिरवा!

पॅराशूट तयार करा

१. आईकडून एक कागदी नॅपकिन्स, दोरा आणि एक कपडयाचा चिमटा घ्या..

२. दोरीचे चार तुकडे कापा.



३. कागदाला चारी बाजूने दोरी बांधा.

४. मग चारी दोऱ्या एकत्र बांधा आणि त्याला चिमटा लावा.

५. मग ते सरळ करून त्याची गुंडाळी करा.



जेवढे शक्य असेल तेवढे वर फेका. पण घरात नाही.

दोन शिंगी विदूषक तयार करा

१. एक लहान कागदी पिशवी घ्या, क्रेयॉन्स आणि कात्री पण घ्या..

२. पिशवीवर खडूने एक मजेदार चेहरा काढा.

३. त्यावर दोन छिद्र पडून नाक काढा.

४. पिशवीमध्ये स्वतःचे हात घाला . छिद्र मध्ये एक बोट घाला.



५. आता तुमची शिंगे हलवा फिरवा आणि स्वतःचे नाक फिरवा.

चक्री तयार करा

१. चार कागदी कप, एक पुठ्ठा, डिंक, एक मोती, एक पिन आणि एक काठी घ्या.



२. अशाप्रकारे पुठ्ठ्यावर दोन ओळी काढा.

३. आता डिंकाने पुठ्ठ्याच्या चारी कोपऱ्याना एक एक कप चिकटवा.



४. पुठ्ठयावर दोन ओळी जिथे एकमेकांना मिळतात तिथे एक पिन टोचा.

५. पिनेमध्ये मोती लावा. मग पिनेला काठीत टोचा.



आता स्वतःची चक्री बाहेर हवेत फिरवा!

पक्ष्यांना आनंदी करा

१. एक छोटे खोके, कात्री आणि थोडी वायर घ्या.



२. वडिलांकडून खोके असे कापून घ्या.

३. त्यांच्याकडून असे छिद्र पाडून घ्या.

४. छिद्रामध्ये दोरा ओवून घ्या.

५. त्या घरात ब्रेडचे तुकडे नाहीतर धान्य ठेवा.

६. कोणत्याही झाडाला ते टांगा.

मग पक्षी जेवणासाठी आनंदाने येतील.

मुखवटा तयार करा

१. त्यासाठी तुम्हाला एक कागदी पिशवी, रंगीत खडू,रंगीत कागद, कागदी कप कात्री लागेल.

२. पिशवीवर एक मजेदार चेहरा काढा.डोळ्यांसाठी दोन भोकं पाडा.

३. नाकासाठी एक कागदी कप लावा.



४. काही कागद असे कापून केस म्हणून ते चिकटवा.

५. मग काळा कागद घेवून एक चष्मा तयार करा.

६. मग तुम्ही तुमचा मुखवटा लावा..

मग तुमचे मित्र विचारतील तुम्ही कोण आहात?

शेवट